15 N.A.0703(Legal)

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/ ४२८७/०६-०७ दिनांक- २९/३/२००७

प्रति,
जमीन/जागामालक - श्री. किसन भास्कर वैती व ईतर
अधिकार पत्रधारक - मेसर्स रवि डेव्हलपर्स
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स बॉम्बे आर्किटेक्चरल कन्सलटंट

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे — घोडबंदर
सर्वे क्र./ हिस्सा क्र. २२५पै.
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १.आपला दि.१३/०२/२००७ चा अर्ज.
२.मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र.
यु.एल.सी./टी.ए/टे.नं.४/घोडबंदर/एस.आर-६७,
दि.२७/०४/२००६ व यु.एल.सी./टिए/एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/
एसआर-१६६३, दि.०५/०९/२००६ ची मंजुरी.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे — घोडबंदर सर्वे.क्र./हिस्सा.क्र. २२५पै. मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटीस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी कॅपिटेशन फीसचा भरणा करुन अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी ७/१२ उता-यावरिल ईतर लोकांचे सम्मती / अधिकारपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

४) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विषयांकित जागेसाठीचा मे. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील पोट हिस्सा मोजणी कायम मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहिल

५) पोहोंच रस्त्याखालील जागा निरंतरपणे विनातक्रार सुस्थितीत ठेवणे बंधनकारक राहिल.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

Exellency.

3 N.A.1004(Legal)

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/३९६/१०-११ दिनांक- २९/४/२०१०.

प्रति,
जमीन/जागामालक - श्रीमती दुमुबाई अंतोनी डिसोजा, श्रीमती जयश्री मोतीराम कोळी व इतर, श्रीमती भानुबाई धनाजी वैती व इतर
अधिकार पत्रधारक - मेसर्स रवि डेव्हलपर्स
द्वारा- वास्तुविशारद - मे. अनिष ॲन्ड असो. / मे निपूण मिस्त्री

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - घोडबंदर
सर्वे क्र./ हिस्सा क्र. ८६/२,३,४,८ब, ८७/१पै.
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश
प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी
नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १. आपला दि.०५/०४/२०१० चा अर्ज.
२. मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र.
यु.एल.सी./टी.ए/टे-४/घोडबंदर/एस.आर-१९२/९५, दि.०६/१२/९७ व
यु.एल.सी./टिए/एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/एसआर-१३५६, दि२०/१०/२००३, एसआर-१८७१, दि. ची मंजुरी.
३. दि.१८/०३/२०१० चे शपथपत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे - घोडबंदर सर्वे.क्र./हिस्सा.क्र. ८६/२,३,४,८ब, ८७/१पै. मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटींस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विद्युतपुरवठा करणेबाबत महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील मोजणी नकाशा सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.१८/११/२००८ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

४) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी इस्टेट इंव्हेस्टमेंट कं. प्रा.लि. यांचेकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

५) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी पोहोच रस्ता विकसीत केल्याबाबतचा दाखला, अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला, सांडपाणी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, पाणीपुरवठासाठी जल वाहिनी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, उद्यान व वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे. तसेच परवानगी अपेक्षिलेल्या भूखंडातून नैसर्गिक नाला असेल तर आपण सदर नैसर्गिक नाल्याचे बांधकाम करुन देणे आपणावर बंधनकारक राहिल.

६) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी कॅपिटेशन फीसचा भरणा करुन अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

७) आपण दिलेल्या दि.१८/०३/२०१० च्या शपथपत्रातील नमुद अटी आपणावर बंधनकारक राहतील.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
१) मा. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे
नागरी संकुलन, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
२) प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.